# स्त्री कामगार संघटना बांधणी : एक अडथळ्याची शर्यत

ज्या कारखान्यामध्ये बहुसंख्य कामगार स्त्रिया असतात किंवा स्त्री - कामगारांचे प्रमाण मोठे असते, तेथे संघटना बांधणे किंवा बांधल्यानंतर मागण्या मिळविणे हे पुरुष-कामगार असलेल्या कारखान्यापेक्षा फार कठीण असते.

संघटना बांधण्याच्या प्रयत्नांना अगदी सुरुवात करतानापासूनच जे अडथळे येतात, त्यांची पार्श्वभूमी आजच्या समाजातील स्त्रीचे स्थान व त्यामुळे एकूण समाजाची घराबाहेर काम करणाऱ्या स्त्रीबद्दल किंवा अशा स्त्रीची स्वतःबद्दल विचार करण्याची पद्धत यांच्याशी संबंधित आहे.

सर्वात प्रथम, आपल्याला काही हक्क आहेत किंवा आपल्यावर काही अन्याय होत आहे याची जाणीव होण्यासच वेळ लागतो. नोकरी करणाऱ्या स्त्रीला फक्त घरकाम करण्याऱ्या स्त्रीपेक्षा पुष्कळच जास्त कष्ट करावे लागतात. कारण ती नोकरी करते म्हणून तिच्यावरील घरकामाचा बोजा मुळीच कमी होत नाही; किंवा स्वतः कमावलेल्या पैशाचा काही भाग घरातील आपले कष्ट कमी करण्याकरता वापरण्याचे स्वातंत्र्यही बहुतेक वेळा तिला नसते. एवढेच नव्हे, तर ती ८ – १० तास घराबाहेर काढते म्हणून राहिलेल्या वेळेचे मिनिट अन् मिनिट तिने घराकडे लक्ष देण्यात, नवऱ्या-मुलांचे करण्यात घालवला पाहिजे अशी इतर सर्वांचीच नव्हे तर तिची स्वतःचीही धारणा असते, आणि अशी सर्व परिस्थिती असूनही, नोकरी न करणाऱ्या स्त्रीपेक्षा तिचे स्थान अधिक आहे असेही समजले जाते.

अशा प्रकारचा विचार फक्त विवाहित आणि मुले असलेल्या स्त्रियांबद्दलच केला जातो असे नाही, तर जी अविवाहित आहे तिची वागणूकही 'तिच्या भल्या'च्या दृष्टीने, नोकरी केली तरी 'घरकामही व्यवस्थित करणारी' असे म्हणवून घेणारी असावी लागते. आणि ज्या स्त्रियांना 'निराधार' असे विशेषण लावले जाते (परंतु ज्या खरे पाहता पूर्णपणे स्वतःच्या पायावर उभ्या असतात) त्यांचे तर काही विचारायलाच नको. त्या बहुतेक वेळा 'आपल्या हक्काच्या घरात राहत नसतात त्यामुळे त्या करतील तेवढे कष्ट कमीच असतात.'

अशा प्रकारे जाणीव होण्यासच वैचारिक पार्श्वभूमीमुळे जे अडथळे येतात, ते वारंवार काहीजणींबरोबर चर्चा करून, काही वाचायला देऊन, इतर ठिकाणी संघटना बांधल्यामुळे झालेल्या फायद्याची प्रत्यक्ष उदाहरण देऊन इ. प्रयत्नांनी दूर करता आले आणि हक्कांची, होणाऱ्या अन्यायांची काही स्त्रियांना जाणीव करून देण्यात यश आले तर पुढील प्रत्यक्ष कामातील अडचणी समोर उभ्या राहतात.

संघटना बांधण्याचे ठरवल्यानंतर काही कार्यकर्त्यांना वरचेवर आणि सर्वांना मधून कधीतरी रोजच्या कामाच्या तासांपेक्षा थोडा अधिक वेळ घराबाहेर काढणे आवश्यक होते. ही गोष्ट सर्वसामान्य कामगार स्त्रीलाच नव्हे तर कार्यकर्त्या होऊ इच्छिणाऱ्या निवडक स्त्रियांनाही कठीण होते. कारखाना सुटल्यावर जवळपास मिटींग घेण्याऐवजी घरी जाऊनच विचारविनिमय करावा लागतो.

काही कार्यकर्त्या तयार झाल्यावर मात्र त्याही भरपूर धडपड करतात. पण सर्वांना संघटनेमध्ये सामील करण्यात स्त्री म्हणून काही खास अडचणी येतात.

प्रत्येक कारखान्यात काही स्त्रिया तरी विशेषतः- कारखान्याची सुरवात करताना कामावर घेतलेल्या —'निराधार' असतात. अशा स्त्रियांना संघटनेत सामील करून घेणे सर्वात कठीण असते. सुरुवातीपासून त्यांच्या मनात पक्के बिंबवलेले असते की मालकाने त्यांच्यावर फार उपकार केले आहेत. ही भावना त्यांच्या मनातून निघणे फार कठिण असते. कित्येकदा कोणत्यातरी अडचणीच्यावेळी मामुली मदत करून ही उपकारकर्त्याची भूमिका अधिक दृढ केली जाते. त्याच्या बदल्यात त्यांनी कारखाना उभारण्यात पहिल्यापासून भाग घेतलेला आहे किंवा अत्यंत कमी वेतनावर काम केलेले आहे याचा विसर पडलेला असतो. वडिलधाऱ्या कुटुंबप्रमुखाबद्दल असावा तशा प्रकारचा आदर त्यांना मालकां-

बद्दल असतो. याउलट त्यांची युनियन बांधायला येणारे लोकच त्यांना 'बाहेरचे', 'परके' वाटतात नोकरी जाण्याची भीती या स्त्रियांना इतर स्त्रियांपेक्षा जास्त वाटते.

याशिवाय सर्वसाधारणपणेही संघटनेत सामील होण्यास घरून परवानगी न मिळण्याची शक्यता असते. पुरुष कामगारांच्या बाबतीत हा परवानगी वगैरे मिळण्याचा प्रश्न नसतो.

या सर्व अडचणींवर मात करून संघटना बांधण्यापर्यंत प्रगती झालीच, तर इतर कारखान्यांप्रमाणेच, प्रत्यक्षात संघटना स्थापन होण्यापूर्वीच मालकांपर्यंत ही बातमी पोहोचतेच ! आणि संघटना मोडून काढण्याच्या मालकाच्या कारवाया सुरू होतात.

संघटना मोडण्याच्या इतर मार्गांव्यतिरिक्त स्त्री-कामगारांची संघटना मोडण्याचे खास मार्ग कोणते ?

स्वतः मालकाने वेडंवाकडे बोलून किंवा सुपरवायझर्सना बोलायला लावून स्त्री-कामगाराला मनस्ताप दिला जातो. काही ठिकाणी उघड उघड तुच्छतेने बोलले जाते, तर काही वेळा असे शब्द वापरले जातात की वरवर पाहता त्यात आक्षेपार्ह असे काही दिसणार नाही, परंतु आडून केवळ मतस्तापच दिला जात नाही तर मानसिक अत्याचारच केला जातो. या बाबतीत तक्रार करणेही फार कठिण असते. अशा कृत्यांविरुद्ध संघटनेचा आधार घेऊन काही विरोध करण्याऐवजी संघटनेत सामील झाल्यामुळे असे झाले या विचाराने सुरुवातीला तरी अशा स्त्रिया संघटनेपासून दूरच जातात.

ज्या ठिकाणी युनियन नसते अशा कारखान्यात पुष्कळदा बाळंतपणाच्या रजेसारखे हक्कही नसतात. काही ठिकाणी तर कामावर घेतानाच स्त्री विवाहित असेल तर मुले न होण्याचे ऑपरेशन केले असल्याची खात्री करून घेऊनच तिला कामावर घेतले जाते. याउलट काही ठिकाणी स्त्री गर्भवती असताना तिच्या नाजूक अवस्थेचे भांडवल करून मालक आपला स्वार्थ साधतात. एक स्त्री गर्भवती असताना तिचे नेहमीचे काम करण्यास तिला त्रास होऊ लागला. अशा वेळी तिची पॅकिंग विभागात बदली करून त्या 'उपकाराच्या' बदल्यात तिच्याकडून पॅकिंगचे काम पूर्वी केले जात होते त्यापेक्षा बरेच जास्त करून घेतले गेले. आणि मग तिचे उदाहरण देऊन त्या विभागातील इतर स्त्रियांनाही जास्त काम करायला लावले.

एका कारखान्यामध्ये पुरुष कामगार करतात तेच काम महिला कामगारही करतात. परंतु त्यांना पुरुषांच्या निम्मे वेतन मिळते याबद्दल तक्रार केल्यास असे उत्तर मिळते की त्या जे काम करत आहेत ते 'स्त्रीसुलभ' नसल्यामुळे स्त्रियांच्या हातून ते पुरुषांइतके चांगले होऊच शकत नाही; आणि कारखान्याला ते काम करण्यासाठी पुरुष कामगार मिळणार नाहीत असे नाही. परंतु त्या स्त्रियांवर उपकार म्हणून त्यांना नोकरीवर घेतले गेले आहे.

आजच्या एकूण समाजरचनेमुळे जातीयवाद कोणत्याही जातीत पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो. एका कारखान्यात काही कामगार स्त्रिया ब्राह्मण आहेत, तर काही हरिजन आहेत. हरिजन स्त्रिया आपला ब्राह्मणावरचा राग सत्तेवर असलेल्या ब्राह्मणांवर काढण्या ऐवजी आपल्याबरोबर काम करणाऱ्या ब्राह्मण कामगार स्त्रियांवर काढतात आणि ब्राह्मण स्त्रिया आपल्या कोणत्या जन्मीचे पाप म्हणून आपल्याला यांच्याबरोबर काम करावे लागते असा विचार करतात. अशा परिस्थितीत संपूर्ण एकजूट होणे किती कठिण आहे !

ज्या शहरांमध्ये एकूण कामगार चळवळ प्राथमिक अवस्थेत असते, म्हणजे एकूण कामगारांच्या संख्येच्या मानाने कामगार संघटना कमी असतात किंवा असलेल्या संघटना केवळ आर्थिक प्रश्नापुरत्या मर्यादित असून कामगारांना राजकारणापासून दूर ठेवतात, तेथे अशा प्रकारच्या अडचणींवर मात करणे कठिण असते. पण जेथे एकूण कामगार संघटनांमध्येच ही जाणीव झालेली असते की स्त्री - कामगारांचे काही वेगळे प्रश्नही आहेत तेथे व्यापक कामगार – शक्तीचे दडपण आणून मार्ग शोधता येतो. ज्याप्रमाणे स्त्रियांची चळवळ ही एकूण शोषित वर्गाच्या चळवळीपासून अलग असू शकत नाही त्याचप्रमाणे स्त्रीकामगारांचे प्रश्न सोडवणे हे एकूण कामगार चळवळीपासून अलगपणे होऊ शकत नाही.

**डॉ. कल्पना जवळेकर**